# संपादकीय

## ‘मधुबनी’में लोकशाही

वास्तविक उद्योगपती आणि मध्यमवर्ग यांना जिंकण्याचा वा जोडून घेण्याचा यत्किंचितही प्रयत्न सरकारने केला नाही तरी ते राजीखुशीने आपली सेवा (विद्यामान) सत्ताचरणी सादर करतील. पूर्वसुरींच्या अनुभवसिद्ध नेणतेपणाची यथेच्छ चेष्टा करत स्वत:च्या असिद्ध कर्तृत्वाचे ढोल बडवणारे प्रस्थापित झाले की पूर्वसुरींच्या मार्गानेच जाण्याची वेळ कशी येते याची उदाहरणे अनेक. नुकताच सादर झालेला अर्थसंकल्प हे यातील एक नवे. अणुऊर्जा क्षेत्रात खासगी गुंतवणुकीस आणि विमा क्षेत्रात १०० टक्के परदेशी गुंतवणुकीस मुभा देण्याचा निर्णय या अर्थसंकल्पात आहे. त्याचे स्वागत करताना या निर्णयाचा समर्पक अन्वयार्थ लावणे आवश्यक. कारण अमेरिकेशी मनमोहनसिंग यांनी केलेल्या अणुकराराची संभावना भाजपने त्या देशापुढे ‘शरणागती’, ‘अमेरिकेचे मांडलिकत्व’ आदी शेलक्या विशेषणांनी केली आणि ते ‘मांडलिकत्व’, ‘शरणागती’ टाळण्यासाठी अणुऊर्जा कंपन्यांवरील निर्बंधांचा हट्ट धरला. तथापि ताज्या अर्थसंकल्पात तो हट्ट सोडण्याची तयारी दाखवण्याची वेळ त्याच भाजपवर आली असून ही माघार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लवकरच वॉशिंग्टनी डोनाल्ड ट्रम्प दरबारी सादर होणे याचा काहीही संबंध नाही असे मानणे शतमूर्खपणाचे ठरेल. भारतीय उत्पादनांवर अधिक जकातीची कुऱ्हाड टाळावयाची असेल तर भारतास अधिकाधिक खरेदी अमेरिकी कंपन्यांकडून करावी लागेल, असा स्पष्ट इशारा ट्रम्प यांनी दिल्यानंतर आलेले हे शहाणपण. जी बाब कोणत्याही धमकीशिवाय मनमोहनसिंग सन्मानपूर्वक करू पाहात होते ती आता आपणास अमेरिकी दडपणाखाली मान खाली घालून स्वीकारावी लागणार. तीच बाब विमा क्षेत्रात १०० टक्के परदेशी गुंतवणूक करू देण्याबाबत. आज जगातील पहिल्या पाच विमा कंपन्यांत दोन अमेरिकी, दोन चिनी आणि एक जर्मन कंपनी आहे. या कंपन्यांस आता भारतीय बाजार खुला होईल. हे सर्व पाहून एन्रॉन समुद्रात बुडवण्याची भाषा करणाऱ्यांनाच त्याचे कसे पुनर्वसन करावे लागले त्याचे, ‘आधार’ला विरोध करणाऱ्यांनी ‘आधार’सक्ती केली त्याचे, वा ‘जीएसटी’ नको म्हणणाऱ्यांनीच तो कसा गोड मानून घेतला इत्यादी सर्वांचे वा यातील काहींचे स्मरण झाल्यास आश्चर्य नाही. असो. उशीर झाला म्हणून शहाणपणाचे महत्त्व काही कमी होत नाही. ‘लोकसत्ता’कडून या अर्थसंकल्पी निर्णयांचे स्वागत.

तथापि यातून देश म्हणून आपली धोरण–धरसोड तितकी दिसते आणि त्याचमुळे भारताबाबत परदेशी कंपन्या आणि गुंतवणूकदार अधिक सावधगिरी का बाळगतात, हेही समजून घेता येते. ही आपल्याबाबतची सावधगिरीची भावना कमी होण्यास हा अर्थसंकल्प उपयोगी ठरतो, असे ठामपणे म्हणता येत नाही. याचे कारण दीर्घकालीन धोरणांपेक्षा तत्कालिक राजकीय लाभाचाच विचार अलीकडे आपल्या अर्थसंकल्पातून समोर येतो. ताजा अर्थसंकल्प त्यास अपवाद नाही. एकदा कारखानदारांवर सवलतींचा वर्षाव करायचा, त्यांचे गोडवे गायचे, श्रेय घ्यायचे आणि त्याचा जमिनीवरील परिस्थिती बदलण्यात काहीही फायदा झालेला नाही हे लक्षात आल्यावर त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचे आणि सवलतींसाठी नवे गिऱ्हाईक शोधायचे; असा हा खाक्या. यावेळचे हे नवे गिऱ्हाईक अर्थातच मध्यमवर्ग. पण पंचाईत अशी की या वर्गास हवे ते देता यावे यासाठी आवश्यक ती श्रीशिल्लक नाही हे लक्षात आल्याने पुन्हा कात्री लावली गेली ती दीर्घकालीन धोरणालाच. भांडवली खर्चाबाबत (कॅपेक्स) घेण्यात आलेला सार्वत्रिक आखडता हात हे याचे उदाहरण. यंदा ३१ मार्च रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षासाठी भांडवली खर्चाची तरतूद होती ११.१ लाख कोटी रुपयांची. अर्थसंकल्पानुसार हा प्रत्यक्ष खर्च होईल १०.८ लाख कोटी रु. इतका. म्हणजे अपेक्षेपेक्षा कमी. असे असताना आगामी वर्षासाठी सरकार ११.२ लाख कोटी रु. इतकाच खर्च विविध पायाभूत सोयीसुविधा निर्मितीसाठी करणार असे अर्थसंकल्प म्हणतो. म्हणजे ‘विकसित भारता’साठी शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आदीवर खर्च करायला सरकारहाती अधिक पैसाच नाही. कारण मध्यमवर्गीयांस खूश करण्यासाठी प्राप्तिकरात सवलती दिल्याने एक लाखांहून अधिक कोटी रुपयांचा खड्डा पडणार. तो अन्य मार्गांनी बुजवायचा तर वित्तीय तूट वाढणार. आताच ती ४.८ टक्क्यांवर राखली गेली आहे. म्हणजे पाच टक्क्यांची मर्यादा आपण कशीबशी पाळणार. ती नाही पाळली तर आंतरराष्ट्रीय मानांकनातील घसरगुंडीपासून कर्ज उभारणी महाग होणार. हे सर्व न परवडणारे. त्यापेक्षा महत्त्वाच्या कामांसाठी हात आखडता घेणे अधिक सोपे. हाच सोपा मार्ग केंद्र सरकारने रेल्वेबाबतही स्वीकारला असल्याचे अर्थसंकल्पावरून दिसते. रेल्वेसाठी आगामी वर्षात अर्थसंकल्पात २.६५ लाख कोटी रुपयांची तरतूद आहे. यातील धक्कादायक बाब अशी की या भांडवली खर्च रकमेत गेल्या दोन वर्षांत केंद्राने एक रुपयाचीही वाढ केलेली नाही. या रकमेची विभागणी बघा. यातील २.५२ लाख कोटी रु. सरकारी साहाय्यासह एकूण महसुलाद्वारे तर १० हजार कोटी रु. अर्थसंकल्पेतर साहाय्य, तीन हजार कोटी रु. ‘अंतर्गत’ महसूल निर्मिती आणि २०० कोटी रु. निर्भया निधी याद्वारे मिळतील. अशी ही विभागणी. ‘निर्भया निधी’ रेल्वेचा महत्त्वाचा महसुलाधार असावा? एका बाजूने धडाधड ‘वंदे भारत’ वा तत्सम रेल्वेगाड्यांच्या घोषणा आणि त्याचवेळी ‘जनरल’ प्रवाशांचा रेल्वेप्रवास सुखाचा नव्हे तरी निदान सुसह्य व्हावा यासाठी अधिक तरतूद शून्य, असे हे वास्तव. एकेकाळी रामभाऊ नाईक, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर असे काही सत्त्व असलेले नेते रेल्वेसाठी केल्या जाणाऱ्या तरतुदींबाबत कमालीचे जागरूक असत आणि त्यात कपर्दिक जरी कमी झाली तरी आवाज उठवत. तो काळ गेला. आज सामान्य रेल्वे प्रवाशांचे हाल कुत्राही खात नाही, अशी स्थिती. त्यामुळे रेल्वेसाठी एक रुपयाचीही अधिक तरतूद न केली जाणे याची ‘बातमी’देखील होत नाही. रेल्वेचा कल्याणकारी विचार करणारे शेवटचे रेल्वेमंत्री सुरेश प्रभू. त्यांनी स्वहस्ते रेल्वे संकल्प २०१६ साली मुख्य अर्थसंकल्पात विलीन केला आणि पुढे भाजपने त्यांचे अस्तित्वच विलीन करून टाकले. ‘बुलेट ट्रेन’चा हट्ट गोड मानून घेण्याचे चातुर्य अंगी नसल्याने प्रभू यांचे असे झाले असे म्हणतात. असो. पण जे झाले त्यामुळे गेल्या नऊ वर्षांत रेल्वेबाबत एकही मोठी दखल घ्यावी अशी घटना अर्थसंकल्पात घडलेली नाही, याचीही दखल घेणे आवश्यक ठरते. तेव्हा एखादा वर्ग जिंकणे/जोडणे हेच वा इतकेच अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट ठेवले की काय होते हे यातून दिसते. आधी उद्योगपतींस जिंकण्याचा प्रयत्न झाला. आता मध्यमवर्गास. वास्तविक हे दोन्हीही वर्ग असे आहेत की सरकारने जिंकण्याचा वा जोडून घेण्याचा यत्किंचितही प्रयत्न केला नाही तरी राजीखुशीने ते आपली सेवा (विद्यामान) सत्ताचरणी सादर करतील. तरीही त्यांच्या लांगुलचालनाचा प्रयत्न करण्याची गरज सत्ताधीशांस वाटत असेल ती केवळ धोरण अपयशाची कबुलीच ठरते. एकदा या राज्यांस चुचकार, मग त्या राज्यांस, एकदा हा वर्ग, मग तो; या पलीकडे दहा वर्षांनंतरही अर्थसंकल्प जाण्यास काही तयार नाही, हे दुर्दैवी. यंदाचे वर्ष बिहारचे. कारण होऊ घातलेल्या निवडणुका. त्यामुळे अर्थमंत्रीणबाईंनी नेसलेली साडीही खास मधुबनी बिहारी. या असल्या बालिश प्रतीकात्मकतेमुळे आपली लोकशाहीही ‘मधुबनी’में नाचणाऱ्या राधिकेसारखीच बावरलेली राहणार.

सायं.दैनिक बीड किसान दिनांक ४/२/२०२५

CHANGE IN NAME

*I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME*

**Old NAME : NAJARIN SUJAT SHAIKH**
**CHANGE IN TO MY NEW NAME : NAJARIN BEGAM MUKHATARKHA PATHAN**
**PRESENT ADD : AT MADALMOHI, PO MADALMOHI, DIST BEED,431127**
**MO. 7821959810**



**बीड – ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे क्षयरोगींना धान्य वाटपाचा कार्यक्रम क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम जिल्हा रुग्णालय बीड व ग्रामीण रुग्णालय माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उपचार घेत असलेल्या क्षय रुग्णांना मोफत अन्न धान्य किटचे वाटप करण्यात आले या वेळी एकूण ११ लाभार्थ्यांना धन्य किटचे ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने वाटप करण्यात आले यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ विजय कट्टे,डॉ बडे, डॉ दबडगावकर डॉ काळे, डॉ रुद्रवार डॉ मिनाक्षी साळुंखे, डॉ शेजुळ डॉ वाघमारे यावेळी तालूका क्षयरोग सुपरवायजर अर्शद शेजुळ हे उपस्थित होते तसेच सर्व अधिकार आणि कर्मचारी उपस्थित होते.**

# समाजसुधारकांच्या कार्याची ओळख युवकांना व्हावी यासाठी व्याख्यानमाला उत्कृष्ट माध्यम : राजेश करपे

**बीड । किसान न्युज**

माऊली विद्यापीठ संचालित,महिला कला महाविद्यालय, बीड आणि विद्यार्थी विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू व्याख्यानमाला शुक्रवार दिनांक ३१/१/२०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर, मार्गदर्शक मा. राजेश करपे ( इतिहास विभाग प्रमुख, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण), विद्यार्थी विकास मंडळाच्या प्रमुख डॉ. चित्रा धामणे यांची विचार मंचावर उपस्थित होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कुंडीमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. बी .ए.तृतीय वर्षाची विद्यार्थिनी प्राजक्ता कुलकर्णी हिने स्वागतम सुस्वागतम हा मनाचा मुजरा हे स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी



विकास मंडळाच्या प्रमुख .सह प्रा. डॉ.चित्रा धामणे यांनी केले. कार्यक्रम आयोजनाचा मुख्य हेतू आणि राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची विद्यार्थिनींना सखोल माहिती व्हावी, या अनुषंगाने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे अशी मांडणी आपल्या प्रास्ताविकातून केली. व्याख्यानमालेचे मार्गदर्शक मा. राजेश करपे यांनी राजर्षी शाहू महाराजांचा कालखंड, तत्कालीन सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीचे सविस्तर विश्लेषण केले. त्यांनी सांगितले की,एकोणिसावे शतक हे क्रांतीचे युग होते. या क्रांतिकारी युगात झालेल्या अनेक सामाजिक आणि आर्थिक चळवळी याची उकल करत शाहू महाराजांच्या शोषित, वंचितांसाठी घेतलेल्या क्रांतिकारी निर्णयांची मुद्देसूद मांडणी केली. तत्कालीन समाजामध्ये असणारी वर्णव्यवस्था आणि शिक्षण व्यवस्था याची उकल केली. राजश्री शाहू महाराजांचे कोल्हापूर संस्थानातील कार्य याची सविस्तर मांडणी केली.सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण,पालक संवाद,सामाजिक टीकेला समर्थक कार्याने सामोरे जाण्याची निर्भिडता,जातीनिहाय वसतिगृहाची स्थापना,आंतरजातीय विवाह, असे अनेक महत्त्वपूर्ण कार्य शाहू महाराजांनी केले. राजर्षी शाहू महाराजांची प्रगतिशील विचारसरणी आणि त्यांनी राबविलेली धोरणे ही आजच्या सद्य परिस्थितीत देखील तितकीच आवश्यक आणि पूरक आहेत. विचारांचे आदान प्रदान होण्यासाठी अशा व्याख्यानमाला विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरतात असे मौलिक प्रतिपादन प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत असताना डॉ.राजेश करपे यांनी केले. शाहू महाराजांच्या चरित्रातून जात ,धर्म ,पंथ बाजूला सारून आपण सर्वधर्म समभावाने एकत्र आले पाहिजे असा मनोदय देखील त्यांनी मार्गदर्शनातून व्यक्त केला.

# एसटी प्रवासी भाडेवाढ मागे घ्या : मोहम्मद खमरोद्दीन



**बीड । किसान न्युज**

महाराष्ट्राची जीवन वाहिनी असलेल्या एसटी बसच्या तिकीट दारात एकच वेळी १४.९०. टक्के वाढ करण्याचा निर्णय सर्व सामान्य शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यात जाचक आहे. राज्य सरकारने पूर्णविचार करून भाडे वाढीचि निर्णय तातडीने मागे घ्यावा अशी मागणी बीड जिल्हा कॉंग्रेस कमिटी अल्पसंख्यक विभाग बीड शहर अध्यक्ष मोहम्मद खमरोद्दीन यांनी केली आहे. एसटीची प्रवासी भाडेवाढ राज्यात लागू झाली आहे त्यामुळे सर्व सामान्यतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे याची दखल घेऊन शहराध्यक्ष मोहम्मद खमरोद्दीन यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना यांना निवेदन पाठवत एसटीची प्रवासी भाडेवाढ मागे घेण्याची मागणी केली आहे. ग्रामीण भागातील दळणवळण एस टी वर अवलंबून असते त्यामुळे या भाव वाढीचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील सर्वसामान्य प्रवाशांना बसत आहे एसटी महामंडळाचे जनहित सेवा लक्षात घेऊन प्रवाशाच्या सेवेसाठी हे ब्रीद वाक्य खरे ठरवणे त्यासाठी ना नफा ना तोटा हे धोरण अवलबले पाहिजे एसटी महामंडळ हे सरकारच्या उत्पन्नाचे साधन नव्हे तर सर्व सामान्यांना प्रवाशाच्या दळण वळणासाठी निर्माण केलेल्या मूलभूत सेवा आणि गरजा म्हणून ओळखल्या जाण्यात अशी मागणी आता जोर धरू लागली सर्व सामान्याच्या खिशाला कात्री लावणारा हा जाचक निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे राज्य सरकारने पुनर्विचार करून भाडे वाढीचा निर्णय तातडीने मागे घ्यावा.

# धनादेश अनादरामुळे केलेला दंड बीड सत्र न्यायालयाकडून रद्द : ॲड. अविनाश गंडले

**बीड । किसान न्युज**

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, आरोपी जावेद रहीम सय्यद हा पुणे येथे मजुरी कामासाठी गेला होता. त्या ठिकाणी त्याची ओळख फिर्यादी सोबत झाली. त्यावेळी फिर्यादी हा शिक्षण घेण्यासाठी पुणे येथे गेला होता, हे दोघे जण शेजारी राहत असल्यामुळे ओळख झाली. त्यानंतर फिर्यादीकडुन आरोपीने रुपये ५,००,०००/- घर बांधकामासाठी हातऊसणे घेतले व सदरीलची रक्कम मुदतीत दिली नाही. म्हणुन फिर्यादीने आरोपीने दिलेला धनादेश दिनांक १६/११/२०१५ रोजी बँकेत वटवण्यासाठी टाकला असता तो अनादरीत झाला. त्यामुळे फिर्यादीने मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी मा. श्रीमती के.सी. बागल यांच्याकडे प्रकरण दाखल केले. सदरील प्रकरणात आरोपी व फिर्यादी यांच्याकडुन युक्तीवाद झाला. त्यावेळी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती के.सी. बागल यांनी आरोपीस कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट नुसार ६ महिने शिक्षा व रक्कम रुपये ८,००,०००/- फिर्यादीस देण्यास सांगितली व तीन महिन्यात रक्कम



दिली नाही. ६ महिने शिक्षा अशा प्रकारचा निर्णय दिला. सदरील प्रकरणात आरोपी जावेद सय्यद यांनी बीड जिल्हा न्यायालयातील नामांकीत विधीज्ञ ॲड. अविनाश पं. गंडले यांच्या मार्फत अपील दाखल केले. त्यामध्ये दोन्ही बाजुचा युक्तीवाद घेवुन व मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे ग्राह्य धरुन मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब, बीड यांनी दिनांक ०१/०२/२०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली. आरोपी तर्फे ॲड. अविनाश गंडले यांनी काम पाहीले, त्यांना ॲड. विशाल वडमारे, ॲड. इम्रान पटेल, ॲड. बप्पा माने, ॲड. किरण मस्के, ॲड. सुरक्षा जावळे, ॲड. सचिन गिरी, ॲड. राजेश शिंदे यांनी सहकार्य केले.

# न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेसंमेलन उत्साहात

**बीड । किसान न्युज**

कै.आण्णासाहेब पाटील संचलित न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल नेकनूर शाळेचा ११ वा वार्षिक स्नेसंमेलन सोहळा शनिवार दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी उत्साहात पार पडला. या वर्षीच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची थीम होती वृक्षलागवड .भारतीय लोक नृत्य कलेचे विविध कार्यक्रम सादर करण्यात आले.गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास साधून तसेच अभ्यास करून कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊन आपल्या पालकांचे व शाळेचे नाव उज्वल करावे असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष मा रमेश भाऊ पोकळे यांनी मांडले तसेच विद्यार्थ्यांसाठी लवकरच नवीन इमारत बांधून माध्यमिक वर्ग देखील सुरू करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्कूलच्या प्राचार्या .स्वाती मॅडम यांनी केले. सर्व मान्यवर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात मा. .मधुकर सावंत साहेबांचे पोलीस अधिक्षक सेवेतील गुणवत्ता पूर्ण योगदान त्यांची कर्तव्यावरील निष्ठा यासाठी त्यांना राष्ट्रपती पदक पुरस्कार मिळाला होता म्हणून त्यांचा न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलच्या




वतीने सन्मान करण्यात आला ते या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून लाभले होते त्यांनी त्यांच्या यशाचा कहाणी सांगून विद्यार्थी आणि पालकांना योग्य मार्गदर्शन केले. त्याच बरोबर प्रमुख अतिथी म्हणून मौलाना सय्यद साबेर अली, उपस्थित होते मोबाईल हा शाप आहे मोबाईल मुळे विद्यार्थी बिघडत चालले आहेत गरज असेल तरच मुलांच्या हातात मोबाईल द्या असा सल्ला मौलाना सय्यद साबेर अली यांनी दिला उपशिक्षणाधिकारी काकडे सर यांनी योग्य असे शैक्षणिक मार्गदर्शन केले.तसेच शिक्षण विस्तार अधिकारी श्री तोडकर साहेब ,युवा उद्योजक सय्यद कौसार भाई, युवा उद्योजक तेजस शिंदे, बन्सीधर हावळे सर, ज्येष्ठ व शिक्षणविस्तार अधिकारी श्री रसाळ सर, हे देखील उपस्थित होते रसाळ सरांनी विद्यार्थी ,शिक्षकासह शाळेचे तोंड भरून कौतुक केले तसेच सरपंच अनिताताई लांडगे,उपसरपंच सचिन शिंदे या कार्यक्रमास उपस्थित होते.

# तरुणांनी ऑनलाइन सायबर बाबत जागरूक राहावे - दादासाहेब एखंडे

**पाचोड । किसान न्युज**

आज सर्वांकडे बऱ्या प्रमाणात अँड्रॉइड मोबाईल आहेत. या मोबाईलमध्ये खूप सारे प, फीचर्स आहेत आणि या फीचर च्या माध्यमातून आपण एकमेकाला काही माहिती शेअर करीत असतो. आणि त्या माध्यमातून विविध गुन्हे तसेच फसवणूक सुद्धा होत असते. ती होऊ नये म्हणून प्रत्येकाने जागरूक राहणे गरजेचे आहे. असे मत शिवछत्रपती कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट चे संचालक दादासाहेब एखंडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिरामध्ये सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड आणि ग्रामपंचायत कार्यालय मुरमा यांच्या संयुक्त विद्यमाने मुरमा या गावी राष्ट्रीय सेवा योजना निवासी विशेष शिबिर सुरू असून आजच्या पाचव्या दिवशी( एक फेब्रुवारी शनिवार) बौद्धिक सत्रात सायबर सेक्युरिटी अँड आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर ते बोलत होते.



सायं.दैनिक बीड किसान दिनांक ४/२/२०२५

CHANGE IN NAME

*I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME*

**Old NAME : GAWARE PRALHAD KALYAN**
**CHANGE IN TO MY NEW NAME : GAWARE PRALHAD KALYANRAO**
**PRESENT ADD : DEVPIMPARI,GEORAI DIST:BEED**
**MO. 9822439591**

पान ४ वरून...

## चंपावती महोत्सव ...

लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, दै वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाठ, कलाकार किशोर धुताडमाल, जतीन वाघामारे, सोनल नहार, संस्कार भरतीचे प्रमोद वझे, बाळू सौंदतिकर यांच्यासह असंख्य कलाकार उपस्थित होते. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर आणि चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे या तिघांनी मिळून सर्व मान्यवरांचे सत्कार करून आपल्या भाषणात स्पर्धेत सहभागी झालेल्या कलाकारांना शुभेच्छा दिल्या. काल दि. ३ रोजी समूह नृत्य मराठी माध्यम इयत्ता ४ थी ते दहावी वयोगटाच्या समूह नृत्य स्पर्धा पार पडल्या. याबरोबरच एकपात्री अभिनय स्पर्धा देखील संपन्न झाली. बाल कलाकारांचा चंपावती महोत्सव कायम सुरु ठेऊ- जगताप, मुळूक, गलधर बीड रंगभूमीला कलेचा मोठा वारसा लाभलेला आहे. हा कलेचा वारसा टिकवून ठेवण्यासाठी कलाकारांना पाठबळ देण्याचा आमचा निर्धार पक्का आहे. निवडणूक आणि राजकारणासाठी आम्ही चंपावती महोत्सव आयोजित करत नाहीत आणि कधी करणार नाहीत. बीडमध्ये प्रतिभासंपन्न कलाकार तयार होत राहावेत आणि कलाकारांचा बालेकिल्ला बीड जिल्हा ही ओळख अबाधित राहावी यासाठी आम्ही प्रतवर्षी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसाचे अवचित्त साधून बीडमध्ये चंपावती महोत्सव आयोजित करत राहणार आहोत असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी व्यक्त केले.

## ब्राह्मण महिला...

विशेष पुरस्काराने गौरव करण्यात आला. ब्राह्मण महिला मंच, घे भरारी फेसबुक ग्रुप व यशस्वी उद्योजिका समूह यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्यस्तरीय सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांना शाल,स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र अशा स्वरूपात राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी व्यासपीठावर परळीचे माजी नगराध्यक्ष तथा अमृत संस्थेचे सल्लागार बाजीराव भैया धर्माधिकारी, परशुराम हिंदू सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा अमृत संस्थेचे सल्लागार विश्वजीत देशपांडे पुणे, संभाजीनगर चे माजी उपमहापौर संजय जोशी, भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस अमृता पालोदकर, ब्राह्मण महिला मंचच्या अध्यक्षा विजया कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध क्षेत्रातील महिलांना सेवा रत्न, समाज रत्न ,शिक्षण रत्न ,आरोग्य रत्न, कलारत्न .आणि उद्योग रत्न असे विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. विशेष म्हणजे या कार्यक्रमात दोन बंधूंनाही गौरविण्यात आले. अनिल डोईफोडे नांदेड आणि राजेंद्र पोद्दार वसमत यांचाही समाज रत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना बाजीराव धर्माधिकारी म्हणाले की,ज्यांना स्त्री माता म्हणून कळाली ते जिजाऊंचे शिवबा झाले. ज्यांना स्त्री बहीण म्हणून कळाली ते मुक्ताईचे ज्ञानेश्वर झाले.आपण सर्वजण केवळ भाषणात महिला सबलीकरणं व स्त्री पुरुष समानता या मोठ मोठ्या विषयांवर बोलत असतो. मात्र खऱ्या अर्थाने आपल्या स्वतःच्या घरापासून ते देशाच्या कारभारापर्यंत जेंव्हा स्त्रीला अधिकार प्राप्त होतील तो दिवस महिलांसाठी ऐतिहासिक ठरेल.आता परिस्थिती खूप झपाट्याने बदलत आहे.चूल आणि मूल तसेच आपल्या कुटुंबाचा गाडा हाकणारी माय माऊली,आपल्या गावाचा,राज्याच्या,देशाचा कारभार चालवत आहे.असे कोणते क्षेत्र नाही की जिथे महिलांची यशोगाथा लिहिली गेली नाही.या सर्व यशस्विनी एक एक शिखरे प्रादाक्रांत करीत आहेत असे त्यांनी सांगितले. विश्वजीत देशपांडे म्हणाले अमृत संस्थेच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना बळ मिळणार आहे तरुण तरुणी व्यावसायिक महिला अशा सर्व घटकांनी योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी संजय जोशी व सौ अमृता पालोदकर यांची समयोचीत भाषणे झाली. सौ विजया कुलकर्णी यांनी संस्थेचा कार्य अहवाल मांडला. यावेळी सौ. राजश्री कुलकर्णी यांनी बहारदार सूत्रसंचलन करून सर्वांची मने जिंकलीसौ. मीनाताई झाल्टे यांनी आभार प्रदर्शन केले व उज्वला ताईंनी स्वागत गीत गायले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ.विजया कुलकर्णी, सौ सुषमा पाठक, सौ.मीना झालटे, सौ.प्रतिमा भाले, सौ.जयश्री चोब, सौ.उज्वला पैठणे, सौ.राजश्री एरंडे, सौ. वंदना कुलकर्णी दिशा स्वयंपाक घरच्या सौ.जयश्री डफळापुरकर, रांगोळी रेखाटन सौ.मनिषा खडके,कु. गिरिजा ठोसर आदींनी परिश्रम घेतले.

## बीड जिल्ह्यातील दिव्यांगांना...

फेब्रुवारीची अंतिम मुदतयोजनेचा लाभ गरजू दिव्यांग व्यक्तींना मिळण्यासाठी अर्जदार नाव नोंदणीची प्रक्रिया २२ जानेवारीपासून सुरू करण्यात आली असून, दिव्यांग व्यांग व्यक्तींकडून ६ फेब्रुवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज मागविले आहेत. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत पोर्टलवर सुविधादिव्यांगांना फिरते वाहन योजनेचा लाभ मिळविण्यासाठी र्ह्रीींिं:// ीशसळींशी.ीहषवल.ले.ळप या लिंकवर अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली आहे. सदर लिंकवर क्लिक केल्यानंतर दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे पोर्टल उघडले जाते. त्यानंतर अर्ज भरण्याची सुविधा यात देण्यात आली आहे. पत्रात शेवटी म्हटले आहे की दिव्यांगांना लाभ घेण्यासाठी पुढील प्रमाणे अटी, शर्थी व अटी लागु करण्यात आले आहे. यासाठी अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा, जिल्हा शल्यचिकित्सक किंवा सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले किमान ४०% दिव्यंगत्वाचे प्रमाणपत्र असावे, अर्जदार १ जानेवारी २०२४ या दिनांकाच्या दिवशी १८ ते ५५ या वयोगटातील असावा.मतिमंद अर्जदाराच्या बाबतीत पालक अर्ज करण्यास सक्षम असतील, दिव्यांग अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख पेक्षा अधिक नसावे, अतितीव्र दिव्यांगत्व असणाऱ्या दिव्यांग व्यक्तीस वाहन चालवण्याचा परवाना नाकारल्यास परवानाधारक नसलेल्या अतितीव्र व्दिव्यांगाच्या सोबतच्या सहाय्याने फिरता मोबाईल व्यवसाय करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील गरजु दिव्यांगांनी तात्काळ ऑंनलाईन अर्ज दाखल करावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.संजय टी.सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : २०१/२०२५**
**( मार्फत विधिज्ञ : श्री एस एस काळे)**

अर्जदार :-
१. शोभाबाई लक्ष्मण गाडेकर, वय ७७ वर्षे, धंदा घरकाम रा.अशोक नगर, बार्शी नाका, बीड ता.जि.बीड,
२. ज्योति भ्र.राजेंद्र गाडेकर, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा.वरीलप्रमाणे,
३. ओमकार पि.राजेंद्र गाडेकर, वय १४ वर्षे, धंदा शिक्षण, रा.वरीलप्रमाणे,
४. जय पि.राजेंद्र गाडेकर, वय १२ वर्षे, धंदा शिक्षण, रा.वरीलप्रमाणे,
अर्जदार क्र.३ व ४ अ.पा.क. आई अर्जदार क्र.२

**विरुध्द निरंक**

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे **राजेंद्र पि.लक्ष्मण गाडेकर** हे/या **दि. ११/०६/२०१७** रोजी सरकारी दवाखाना, बीड, ता.जि.बीड येथे मयत असुन अर्जदार क्र. १ ही मयताची आई आहे. तर अर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. ३ व ४ हे मयताचे मुले आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०३/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
**पुढील तारीख:- १५/०३/२०२५.**

क.लिपीक

आदेशावरुन
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड